# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**CB/59/2025**

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | **दिनांक ०४/११/२०२५** |

**'' पोलीस असल्याची बतावणी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखेकडुन अटक''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह. आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी पोलीस बतावणीचे गुन्हयांना प्रतिबंधक करणेकामी व घडलेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

दिनांक ३१/०७/२०२५ रोजी श्री.पवनकुमार रामअवतार केजरीवाल, वय ६८ हे खारघर परिसरात घरगुती सामान आणण्यासाठी गेले असता त्यांना रस्त्यात थांबवून अनोळखी आरोपीने पोलीस असल्याचे सांगुन, पोलीस आय डी कार्ड दाखवून रमेश पाटील या व्यक्तीस त्याच्या घरी गांजा सापडल्यामुळे पोलीसांनी तुरुंगात टाकले आहे. असे खोटे सांगुन त्यांचे गळयातील सोन्याची चैन व हातातील अंगठी सर्व बॅग मध्ये ठेवण्यास सांगून आरोपीने १,५०,०००/— रू कि.ची दागिने हातचालाखीने चोरून नेले. म्हणुन खारघर पोलीस ठाणे गु.र.नं.३२२/२०२५ बी.एन.एन.एस कलम २०४,३१८(४) प्रमाणे गुन्हा नोंद केला.

वरील नमुद गुन्हयाचे घटनास्थळी कक्षाकडील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ भेट देवुन घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मधील आरोपीचे लोणावळा व पिंपरी चिंचवड या येण्या जाण्याचे मार्गावरील साधारण २० ते २५ दिवस सतत फुटेजची पाहणी करून आरोपीतांची टी.व्ही.एस. अपाची मो. सायकल क्रमांक **MH 15 BA 1617** निष्पन्न केली. सदर वाहनाबाबत गोपनिय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त करून वरिष्ठांचे पुर्वपरवानगीने दिनांक १२/१०/२०२५ रोजी पुणे येथे जावून आरोपी नामे सज्जाद गरीबशहा इराणी याचा स्थानिक पोलीसांचे सहाय्याने शोध घेत असताना आरोपीची पत्नी ही चोरीच्या सोन्याच्या दागिन्यांची विल्हेवाट लावणेकरीता जात असताना मिळुन आली. आरोपीची पत्नी फिजा सज्जाद इराणी हिचे ताब्यातून एकुण **११८६ ग्रॅम** वजनाच्या सोन्याच्या बांगडया, नेकलेस, मंगळसुत्र, चैन, कानातील झुमके, ब्रेसलेट, पेंडंट, अंगठया असे दागिने व बनावट आयडी कार्ड, आधारकार्ड, पॅनकार्ड असा मुद्देमाल मिळुन आला. त्याचप्रमाणे आरोपीने गुन्हयात वापरलेली वर नमुद मोटार सायकल आरोपीचे राहत्या घराजवळुन ताब्यात घेतली. अशा प्रकारे सदरचा गुन्हा उघडकीस अणुन **एकुण १,२५,१०,६८६/—रू कि.चा मुद्देमाल** हस्तगत केला आहे.

नमुद गुन्हयातील आरोपीत सज्जाद गरीबशहा इराणी याने त्याचे साथीदारांसह नवी मुंबई परिसरात गुन्हे केल्याची कबुली दिली असुन त्याचे निवेदनाप्रमाणे पोलीस असल्याची बतावणी केलेले **एकुण १५ गुन्हे** उघडकीस आलेले आहेत. नमुद आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्यावर एम.सी.ओ.सी कायदयाअंतर्गत व इतर १०० हुन अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

**अटक आरोपीचे नाव पत्ता :—**

१) सज्जाद गरीबशहा इराणी, वय ४७ वर्षे, रा.किंग स्टोन, अटलांटिक बिल्डींग, ए विंग, रू नं २०२, क्लाउड ९, कोंढवा, पुणे, मुळ रा. इराणी वस्ती, श्रीरामपुर, अहिल्यानगर.

यास दिनांक २८/१०/२०२५ रोजी १२:४९ वा. अटक करण्यात आलेली असुन दिनांक ०६/११/२०२५ रोजी पर्यत पोलीस कोठडी मंजुरी आहे.

**आरोपीकडुन उघडकीस आलेले गुन्हे :—**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हे रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | खारघर | ३२२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (१), ३(५) |
| २ | पनवेल शहर | ३५६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०५, ३१८(४), ३(५) |
| ३ | पनवेल शहर | ४२७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०५, ३१८(४), ३(५) |
| ४ | पनवेल शहर | ४१९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५) |
| ५ | पनवेल शहर | ३२३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४ |
| ६ | खांदेश्वर | २४९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४), ३(५) |
| ७ | कामोठे | ११८/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४),३१९(२), ३(५) |
| ८ | कामोठे | १३२/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४),३१९(२), ३(५) |
| ९ | खारघर | ३१०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८(१) |
| १० | खारघर | ३२०/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८(१) |
| ११ | सीबीडी | ३०३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४) |
| १२ | नेरुळ | ४१८/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४,३१६(२),३१८(४), |
| १३ | सानपाडा | २४१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४), ३(५) |
| १४ | सानपाडा | २११/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४), ३(५) |
| १५ | रबाले | ६२६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २०४, ३१८ (४), ३(५) |
| १६ | जळगाव, रामानंद पोलीस ठाणे | ३४४/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) |

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, नवी मुंबई, श्री.अजयकुमार लांडगे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अनिल पाटील यांचे नेतृत्वात सपोनि एकनाथ देसाई, पोउपनि देशमुख, पोहवा/२०८७ धनवटे, पोहवा/२३६५ दुधाळ, पोहवा/२३८६ जोशी, पोहवा/२३६५ दुधाळ, पोहवा/२०१६ पाटील, पोहवा/२०९१ जेजुरकर, पोहवा/४४८६ पांचाळ, मपोह/२५४८ चंदगिर, पोहवा/४४७७ सावंत, पोना/२८३६ मोरे, पोना/३०३४ गायकवाड, पोशि/४४०९ तांदळे, पोशि/३१९६ भोये, मपोशि/१२५४८ गायकवाड यांनी केलेली आहे.

००००००००००००००००००